Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प रि प त्र क

28/२०२२

विषय - 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' अंतर्गत 'हर घर तिरंगा' उपक्रम अंमलबजावणी बाबत..

सदंर्भ - मा. जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे क्र.कार्या.१२/३/सा.प्र./कावि/३२९/२०२२ दि.०५/०८/२०२२ रोजीचे बैठकीचे इतिवृत्त

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक व विद्यापीठातील विद्यार्थी/विद्यार्थीनी आणि संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थेमधील मा.प्राचार्य, संचालक, शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना कळविण्यात येते की, 'आझादी का अमृत महोत्सव' अंतर्गत दि.१३ ऑगस्ट, २०२२ ते दि.१५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत **'हर घर तिरंगा'** हा उपक्रम राबविण्याबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार मा. जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे कडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार सर्वांनी सोबतच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यात यावा.

प्र.कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जा.क्र. आस्थापना/ 1699
दि. 12 AUG 2022

प्रति,

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
३) मा.प्राचार्य /संचालक सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.
४) विभाग प्रमुख - सुरक्षा विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
५) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.
- यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

- **विभागप्रमुख व प्राचार्य/संचालक यांनी सदरचे परिपत्रक शिक्षक व सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवक व विद्यार्थी/विद्यार्थीनीच्यां निदर्शनास आणावे.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर,
स्वराज्य भवन, नागाळा पार्क, कोल्हापूर

दुरध्वनी : 0231 / 2665813 E-mailID: rdckop@gmail.com

क्र.कार्या.12/3/मा.प्र./कावि 320 /2022 दि. 05/08/2022

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा या उपक्रमाच्या अंमलबजावणी बाबतच्या आढावा बैठकीचे इतिवृत्त

आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत दि, 13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2022 या कालावधीमध्ये देशभरात हर घर तिरंगा हा उपक्रम राबविण्याबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्याअनुषंगाने मा.जिल्हाधिकारीसो यांनी दि.05/08/2022 रोजी बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी / प्रतिनिधी उपस्थित होते.

1. मा.श्री राहुल रेखावार, जिल्हाधिकारी कोल्हापूर
2. मा.कादंबरी बलकवडे, आयुक्त महानगरपालिका कोल्हापूर
3. मा.श्री संजयसिंह चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर
4. मा.श्री शैलेश बलकवडे, पोलीस अधीक्षक कोल्हापूर

तसेच संचालक राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर, कमांडर एन सी सी.कोल्हापूर, कामगार अधिकारी एस.टी.महामंडळ कोल्हापूर, प्रतिनिधी शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर हे उपस्थित होते. सदर बैठकीस आयुक्त इचलकरंजी महानगरपालिका, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

1. हर घर तिरंगा उपक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनामार्फत झेंडयांची उपलब्धता होणार असली तरी स्थानिकरित्या झेंडे उपलब्ध होणार असतील तर त्यास प्रोत्साहन देण्यात यावे.
2. प्राप्त होणारे झेंडे हे नियमाप्रमाणे/संहितेप्रमाणे असल्याची खात्री करण्यात यावी.
3. केंद्र सरकारकडून केवळ तिरंगा झेंडा उपलब्ध होणार असून, त्यासोबत काठी मिळणार नाही. काठीची व्यवस्था स्थानिक स्तरावर करावयाची आहे. रास्तभाव दुकानदार शक्यतो काठीला झेंडे लावून विक्री करतील
4. केंद्रशासनाकडून प्राप्त होणारे झेंडे तालुकानिहाय वितरीत करणेत येवून तहसिलदार, गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी यांनी क्षेत्रीय वॉर्ड कार्यालये, ग्रामपंचायत कार्यालये व रास्तभाव धान्य दुकानदार यांचेमार्फत विक्री करावयाची आहे.
5. तालुकास्तरावर राजकीय संघटना व पक्षप्रमुख यांची बैठक घेऊन झेंडे वितरण/दान करणेबाबतचे नियोजन करण्यात यावे.
6. स्थानिक पुरवठादार यांनी झेंडा नियमावलीनुसारच पुरवठा करवयाचे आहेत, त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादार यांची राहील.
7. शासनाकडून प्राप्त होणारे झेंडे तालुका स्तरावरुन ग्रामस्तरावर वितरित करण्यासाठी एक ठिकाण निश्चित करावे.
8. या निश्चित केलेल्या ठिकाणी प्राप्त झेंडयांची तपासणी करुन त्यामधून ध्वजसंहितेनूसार नसलेले ध्वज वेगळे करुन फक्त गुणवत्तापूर्ण व ध्वजसंहितेनूसार असलेले ध्वज वितरित होतील याची संबंधीत तहसिलदार, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी यांनी दक्षता घ्यावी.याबाबत स्वतंत्र नोंदी ठेवण्यात याव्यात.

9. दि.13 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट या कालावधीमध्ये प्रत्येक नागरीकांच्या घरावर तसेच सर्व शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापना/सहकारी संस्था/शैक्षणिक संस्था यांचे इमारतीवर ध्वजाची उभारणी स्वयंस्फुर्तीने करणे अपेक्षित आहे. हे तीन दिवस घरोघरी तिरंगा फडकवताना दररोज संध्याकाळी झेंडा खाली उतरावयाची आवश्यकता नाही. परंतू, कार्यालयांना यासंबंधी ध्वजसंहिता पाळावी लागेल, म्हणजेच कार्यालयांनी दररोज सुर्यास्तापूर्वी ध्वज उतरविणे आवश्यक आहे.

10. जिल्हा परिषद कोल्हापूर येथे शासनामार्फत प्राप्त होणारे झेंडे विक्रीसाठी केंद्र स्थापन करण्यात आलेले असून, त्यामध्ये जिल्हा परिषदेकडे उघडण्यात आलेल्या बचत खात्यामध्ये धनादेशाद्वारे अथवा आरटीजीएस द्वारे रक्कम जमा करुन झेंडे घेता येतील. तसेच तालुक्यांकडून जमा होणारी रक्कम या खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

बचत खाते नांव	-	Har Ghar Tiranga ZP Kolhapur
बचत खाते क्रमांक	-	018222010000369
IFSC Code	-	UBIN0901822
बँकेचे नांव	-	Union Bank of India
शाखेचे नांव	-	Laxmipuri

11. ध्वजसंहितेचे पालन होणे व जाणते अजाणतेपणे ध्वजाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत नागरीकांमध्ये जाणीव जागृती निर्माण करावी. तालुका स्तरावर गटविकास अधिकारी यांनी स्वातत्र्यरथामधुन प्रचार व प्रसिध्दी करणेचे आयोजन केले आहे. प्रचार व प्रसिध्दी यामध्ये स्वंयसेवक, क्रिडामंडळे, तरुण मंडळे यांचे सहभाग घ्यावा. विधवा महिला, स्वातंत्र्य सैनिक, आजी /माजी सैनिक यांचे हस्ते ध्वजारोहण करणेत यावे.

12. एकाच इमारतीमध्ये एकापेक्षा जास्त कार्यालये असतील अशा इमारतीवर एकच झेंडा फडकविण्यात यावा.

13. अभियान कालावधीनंतर झेंडा उतरविताना काळजीपूर्वक सन्मानाने उतरवून तो सुरक्षितपणे जतन करुन ठेवावा. यासंबंधाने आयोजित केलेल्या प्रभात फेरी, प्रचार प्रसिध्दी कार्यक्रम यांची माहिती शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. यासाठी आवश्यक असणारे तहसिलदार,गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी यांचे लॉगीन आयडी व पासवर्ड आपणांस कळविण्यात आलेले आहेत.

14. अभियान कालावधीत ड्रोनद्वारे चित्रिकरण करुन लघुचित्रफीत तयार करण्यात याव्यात.

15. या संपूर्ण अभियानात उपविभागीय अधिकारी यांचे नियंत्रणाखाली तहसिलदार, गटविकास अधिकारी व मुख्याधिकारी यांनी समन्वयाने कामकाज करावयाचे आहे.

16. अभियान कालावधीत ध्वज फडकविणे व उतरविण्याच्या वेळेबाबत शासनाकडून सूचना प्राप्त होताच आपणांस कळविण्यात येईल.

वरील दिलेल्या सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्यात येऊन केले कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालाकडे सादर करणेबाबत निर्देशित करण्यात आले. सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

05/08/22

(राहुल रेखावार)
जिल्हाधिकारी, कोल्हापूर

प्रति,
सर्व संबंधित